# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यामध्ये परतीच्या पावसामुळे पिकांवर गुलाबी बोंड अळीचा झालेला प्रादुर्भाव

**(१) २०२६८ (२१-१२-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी विधानसभा मतदार संघातील आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यांतील माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर या महिन्यांत परतीच्या पावसामुळे कपासी पिकांवर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव होवुन पिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांचे शेतात मोठ्या प्रमाणात कपासीचे पिक आले असताना सततच्या पावसाने कपासी पिकांचे ७० टक्के बोंडे तसेच सोयाबीनच्या पिकांचे खोड अळीमुळे नष्ट झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कपासीच्या बोंडामध्ये बोंड अळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने मा. लोकप्रतिनिधी यांनी शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रूपयांच्या मदतीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तालुक्यांमधील नुकसान झालेल्या पिकांची पहाणी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शाासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (३०-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

वर्धा जिल्ह्यात १४५१८७.५२ हेक्टर क्षेत्रावरील कपाशीचे व ११७०६९.८८ हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन पिकाचे ३३% पेक्षा जास्त नुकसान झालेले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) जून ते ऑक्टोबर २०२० या कालावधीत अमरावती व नागपूर विभागातील अतिवृष्टीच्या निकषा बाहेरील पावसामुळे खरीप पीकावर गुलाबी बोंड आळी व इतर रोगांमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरीता तत्कालीन राज्याची आर्थिक स्थिती पाहता निधी उपलब्ध करणे शक्य झालेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महापालिकेत प्राथमिक शिक्षकांच्या नियुक्तीबाबत

**(२) २८५३१ (१२-०६-२०२१). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेत प्राथमिक शिक्षक म्हणून निवड झालेल्या १५० उमेदवारांची अदयाप नियुक्ती झालेली नसल्याने आझाद मैदानावर आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उमेदवारांचे शिक्षण १० वी पर्यंत मराठी माध्यमातून झालेले असल्याने नियुक्ती रद्द करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शिक्षक संघटनेने शासनास व महापालिकेला निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनान कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०९-२०२३) :** (१) सद्य:स्थितीत आझाद मैदानावर आंदोलन सुरु नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) एक वेळची अपवादात्मक बाब म्हणून नियुक्ती न मिळालेल्या उमेदवारांची इंग्रजी संभाषण / अध्यापन कौशल्य चाचणी घेऊन १२२ पात्र उमेदवारांना शिक्षण सेवक पदावर नियुक्त करण्यात आले आहे.

---

**राज्यातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत**

**(३) ३३९६३ (१२-०१-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१९ मध्ये १,३९,११८ व्यक्तिंचा वायू प्रदुषणामुळे मृत्यु झाल्याचे इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च या संस्थेच्या अहवालातून समोर आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील हवा प्रदुषित शहरातील महानगरपालिका व इतर भागधारकांच्या समन्वयातून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने हवा प्रदुषण नियंत्रणासाठी सर्वसमावेशक कृती आराखडा तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आराखडयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०२३) :** (१) इंडियन मेडिकल कॉन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च या संस्थेचा अहवाल शासनास तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त नाही.
(२) हे खरे आहे.
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निरी, नागपूर व आय.आय.टी. मुंबई, नवी मुंबई, उल्हासनगर, बदलापूर, पूणे, नागपूर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, चंद्रपूर, जळगाव, जालना, सांगली, कोल्हापूर, लातूर, नाशिक, सोलापूर, ठाणे व वसई-विरार या १९ हवा प्रदूषण नियंत्रणाकरिता सर्व समावेशक कृती आराखडे तयार केले आहेत. त्या अनूषंगाने सदर आराखडे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमत केले आहेत व त्याची अंमलबजावणी प्रगतीपथावर आहे.
(३) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सदर कृती आराखड्यांच्याबाबत प्राप्त संमतीपत्राच्या अनुषंगाने कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचे आदेश त्या-त्या शहरांच्या महानगरपालिका/नगरपालिका यांना देण्यात आले आहेत.
कृती आराखड्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी महानगरपालिका / नगरपालिका यांच्यासोबत आढावा बैठका घेण्यात येत आहेत. तसेच राज्यामध्ये त्रीस्तरीय समिती-१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती, २. मा. प्रधान सचिव, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय हवा गुणवत्ता संनियंत्रण समिती आणि ३. जिल्हाधिकारी/आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नागरी समिती, शासनाच्या आदेशान्वये गठीत करण्यात आल्या आहेत. संबंधित महानगरपालिका व नगरपालिका यांच्यामार्फत कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचे काम प्रगतीपथावर असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व शासनामार्फत कामकाजाच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर सुधार प्रन्यासच्यातर्फे बांधण्यात आलेल्या निवासी संकुलांच्या पार्किंगच्या जागेवरील अतिक्रमण थांबविण्याबाबत

**(४) ३३९९५ (०२-०२-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुधार प्रन्यासच्या कोट्यावधी रुपये मालकीच्या गुरुदेव नगर येथे नागपूर सुधार प्रन्यास तर्फे बांधण्यात आलेल्या निवासी संकुलाच्या पार्किंगच्या जागेवर होत असलेले अतिक्रमण तात्काळ थांबवून सदर जागा आपल्या ताब्यात घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सभापती ना.सु.प्र. यांना दिनांक १८ डिसेंबर, २०२० व २० मार्च, २०२१ रोजी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण तात्काळ काढण्याबाबत ना.सु.प्र. द्वारे कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) तसेच उक्त जागेवर अतिक्रमण होत असतांना देखील कोणतीही कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) उक्त जागेवर अतिक्रमण होत असल्याचे निदर्शनास येताच अतिक्रमण ना.सु.प्र. कायदा १९३६ चे कलम ९०(ह-३) प्रमाणे अतिक्रमणाची नोटीस दिनांक १८.१२.२०२१ रोजी अतिक्रमणकारी यांना देण्यात आलेली आहे. अतिक्रमीत जागेची नविन मिळकत तयार करुन अतिक्रमणकारी यांच्या नावाची भुमी अभिलेख विभागाच्या अभिलेखात नोंद घेण्यात आलेली आहे, असे निदर्शनास आले. त्यामुळे जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, नागपूर यांच्याकडे दिनांक ०८.०३.२०२१ रोजी अपिल क्र.००४०८/२०२१ अन्वये अपिल दाखल करण्यात आले असून त्यावरील निर्णयानुसार अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करता येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्याचे काम नागपूर महानगरपालिकाद्वारा ओ.सी.डब्लू. या कंपनीला दिल्याबाबत

**(५) ३४००० (१७-०१-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्याचे काम नागपूर महानगर पालिकेद्वारा कंत्राटी तत्वावर ओ.सी.डब्लू. या कंपनीला देण्यात आले असून सदर कंपनी शहरातील नागरिकांना नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा करीत आहे वा कसे यासंदर्भात लेखा परीक्षण करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांना दिनांक १४ मार्च, २०२१ व १७ एप्रिल, २०२१ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओ.सी.डब्लू. या कंपनीद्वारे R & R व I.P. I.P. चे करावयाच्या कामांची सविस्तर माहिती लेखी स्वरुपात उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ओ.सी.डब्लू. या कंपनीचे नियमित व स्वच्छ पाणी पुरवठा करीत असल्याबाबतचे लेखी परीक्षण करण्यात आले आहे काय,

(४) तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) ओ.सी.डब्ल्यु कंपनीचे नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा करीत असल्याबाबतचे लेखा परीक्षण करण्यात आले आहे.
(४) माननीय लोकप्रतिनिधी यांना नागपूर महानगरपालिकेने दि.२४.११.२०२१ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करून दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरामध्ये जाहिरातींच्या फलकांकरीता झाडांची अवैध कत्तल केल्याबाबत**

**(६) ३४३९९ (१७-०१-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील रविनगर, शताब्दी चौक, अमरावती रोड येथे जाहिरातींचे फलकांकरीता रस्त्यांवरील झाडे तोडण्यात आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर झाडे तोडण्याकरीता मनपा उद्यान विभागाची परवानगी घेण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, जाहिरात कंपन्यांवर कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) झाडे तोडण्याकरीता मनपा उद्यान विभागाची परवानगी घेण्यात आली नाही.
(३) रविनगर येथील एक वडाच्या झाडाबाबत अंबाझरी पोलीस स्टेशन येथे दि.२५.११.२०२१ ला एफ.आय.आर. क्र.०५७६ दाखल झाला आहे.
शताब्दी चौक येथील एक पिंपळाच्या झाडाबाबत दि.०५.०९.२०२१ ला एफ. आय. आर. क्र.०५३७ दाखल झाला आहे.
अमरावती रोड येथील तीन पिंपळाच्या झाडाबाबत पत्र क्र.३३५/ओ.डब्ल्यू/ए.सी II दि.२८.०७.२०२१ अन्वये वाडी पोलीस स्टेशन यांना एफ. आय. आर. करिता तक्रार दिली असून अजून पावेतो पोलीस स्टेशन वाडी नागपूर यांनी एफ.आय.आर. दाखल करुन घेतली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील नागरिक मोकाट कूत्रे व रस्त्यांवरील गायी / म्हशींमुळे त्रस्त असल्याबाबत**

**(७) ३४४०३ (१७-०१-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील अभ्यंकर नगर येथील आठ वर्षीय शाळकर मुलगी कुमारी देवश्री कडबे हिला मोकाट कुत्र्यांनी चावा घेतला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहरामध्ये मोकाट कुत्रे व गायी / म्हशींमुळे नागरिक दहशतीमध्ये आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोकाट कुत्रे व गायी / म्हशींना पकडण्याकरीता नागपूर मनपातर्फे कोणतीही यंत्रणा व विभाग अस्तित्वात असुन देखील त्यांचे मार्फत कोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत,
(४) असल्यास, मागील ६ महिन्यांमध्ये किती मोकाट कुत्रे व गायी / म्हशींना पकडण्यात आले आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) महानगरपालिकेच्या घनकचरा विभागांतर्गत पशुवैद्यकिय कक्ष कार्यरत आहे. मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र.६९१/२००९ मध्ये न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्ताकरीता त्यांची नसबंदी करून त्यांना त्यांचे मूळ जागी सोडण्यात येते. मोकाट कुत्र्यांच्या नसबंदीकरीता जिल्हा पशुसंवर्धन विभाग व नागपूर महानगरपालिका यांचेकडून शासनाच्या पशुसंवर्धन विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मोकाट जनावरे पकडण्याकरीता महानगरपालिकेकडील दोन वाहने दोन पाळीमध्ये कार्यरत आहेत. तसेच जखमी व आजारी जनावरांकरीता पशुनिवारा केंद्र उभारण्यात आलेले आहे. तसेच शहरातील मोकाट जनावरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याकरीता जनावरांचे गोठे लोकवस्तीबाहेर स्थानांतरीत करण्यासाठी महानगरपालिकेद्वारे रू.१२५ कोटीचा नंदग्राम प्रकल्प तयार करण्यात आला आहे.

(४) मागील सहा महिन्यांमध्ये ४४० मोकाट गायी/म्हशी व २९८ मोकाट कुत्र्यांना पकडण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर शहरात अवैधरित्या बेडची संख्या वाढवून उपचारासाठी निर्धारित केलेल्या रकमेपेक्षा अधिक शुल्क आकारल्याबाबत

**(८) ३४६३६ (०२-०२-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील डॉ.मंगेश गुलवाडे यांनी कोरोनाच्या काळात अवैधरित्या बेडची संख्या वाढवून तसेच शासनाने उपचारासाठी निर्धारीत केलेल्या रक्कमेपेक्षा अधिक शुल्क रुग्णांकडून वसूल केल्याचे लेखा परिक्षण अहवालात स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने डॉ.गुलवाडे यांना ५ वेळा नोटीसा बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती कोरोना काळात आर्थिक संकटात सापडलेल्या गोरगरीब रुग्णांची आर्थिक लूट करणाऱ्या संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) याप्रकरणी चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने डॉ. गुलवाडे यांना नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(३) याबाबत मनपामार्फत चौकशी केली असता, चौकशी अंती कोरोना काळात डॉ. गुलवाडे यांनी कोविड रुग्णांकडून अतिरिक्त देयके घेतल्याचे निदर्शनास आल्याने, सदर देयके कोविड रुग्णांना परत करण्यास त्यांना पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

डॉ. मंगेश गुलवाडे यांनी अतिरिक्त देयकासंबंधात मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे रिट पिटिशन क्र. २८७८/२०२१ दाखल केली असून, सदर प्रकरणावर मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी स्थगिती दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर महानगरपालिकेच्या हद्दीत असणाऱ्या आसरा नामक कोविड रुग्णालयात कर्मचाऱ्यांच्या वाढदिवसानिमित्त पार्टी साजरी केल्याबाबत

**(९) ३४९३८ (०२-०२-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविडचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करुन चंद्रपूर महानगरपालिकेच्या हद्दीत आसरा नामक कोविड रुग्णालय उभाण्यात आले असून सदर रुग्णालयात दिनांक ९ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास एका कर्मचाऱ्यांच्या वाढदिवसानिमित्त तेथील परिचारिका आणि इतर कर्मचारी यांनी साग्रसंगीतासह ओली पार्टी साजरी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ओल्या पार्टीचे चित्रीकरण समाज माध्यमांव्दारे जनसामान्यापर्यंत पोहचले असून नागरीकांत सदर प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी असलेल्या कर्मचाऱ्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यात व्हेंटिलेटरयुक्त रुग्णालयाची आवश्यकता असतांना महापौरांसाठी लाखो रुपये खर्च करुन नवीन वाहन खरेदी करण्यात आल्याबाबत

**(१०) ३४९४७ (०२-०२-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत व्हेंटिलेटरयुक्त रुग्णवाहिकेची गरज असतांना पैसे नाहीत म्हणून प्रस्ताव प्रलंबित ठेवलेला असतांना दुसरीकडे महापौरांसाठी लाखो रुपये खर्च करुन नवीन वाहन खरेदी करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहनाच्या व्ही.आय.पी. नंबर करीता ७० हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोनाच्या दुसऱ्या व तिसऱ्या लाटेत रुग्णवाहिकेची गरज असतांना सदर प्रस्ताव प्रलंबित राहिल्याने शासकीय निधीची उधळपट्टी करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी मागणी सामाजिक संस्थेने नगरविकास मंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रार दाखल केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत व्हेंटीलेटरयुक्त रुग्णवाहिकेची गरज असताना निधी नसल्याने कोणताही प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आलेला नाही. महापौर यांना वाहनाची व्यवस्था करण्याकरीता महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, निर्णय क्र. एमयुएम-२०२०/प्र.क्र.८८/नवि-१७ दि.३०.०७.२०२० च्या मार्गदर्शक सुचनेनुसार नवीन वाहन खरेदी करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चंद्रपूर महानगरपालिकेत गैरव्यवहाराचे प्रमाण वाढल्याबाबत

**(११) ३५०१२ (०२-०२-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महानगरपालिकेत गैरव्यवहाराचे प्रमाण वाढले असून प्रत्येक कामात टक्केवारी, भागीदारी आणि काम मिळविण्यासाठी दादागिरी मनपातील सत्ताधारी नगरसेवकांकडून करण्यात येत असल्याबाबत गैरव्यवहार करणारे नगरसेवक आणि मनपातील अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नगरविकास मंत्री, नगरविकास राज्यमंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार केली आहे, हे खरे आह काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) चंद्रपूर महानगरपालिकेतील गैरव्यवहाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाच्या दि.१६.६.२०२१, दि.३०.६.२०२१ च्या पत्रान्वये व दि.१४.९.२०२१ च्या अर्धशासकीय पत्रान्वये विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांचेकडून वस्तुनिष्ठ चौकशी अहवाल प्राप्त करून आवश्यक कार्यवाही विभागाच्या स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### तळोजा (ता. पनवेल, जि. रायगड) औद्योगिक वसाहत तसेच कळंबोली येथे रियल - टाईम एअर क्वालिटी मॉनिटरींफ स्टेशनचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१२) ३५१०९ (१२-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता. पनवेल, जि. रायगड) औद्योगिक वसाहत तसेच कळंबोली येथे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे हवेतील प्रदुषणाचे मोजमाप करण्यासाठी सुरु करण्यात येणाऱ्या रियल-टाईम एअर क्वालिटी मॉनिटरींफ स्टेशनच्या कामाला अद्याप सुरूवात झाली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खारघर, तळोजा, कळंबोली, खांदा कॉलनी तसेच पनवेल परिसरात रात्री-अपरात्री औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्यांमार्फत सोडण्यात येणाऱ्या दुर्गंधीयुक्त वायूमुळे नागरिकांना श्वासोच्छवास घेण्यास त्रास होत असल्याच्या तक्रारी संबंधित विभागातील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी रियल-टाईम एअर क्वालिटी मॉनिटरींफ स्टेशन तातडीने सुरू केल्यास त्या विभागातील वायु प्रदुषण कायमस्वरुपी बंद होऊन नागारीकांचे आरोग्य सुरक्षित होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने तळोजा औद्योगिक वसाहत तसेच कळंबोली येथे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे हवेतील प्रदुषणाचे मोजमाप

करण्यासाठी रियल-टाईम एअर क्वालिटी मॉनिटरींफ स्टेशन तातडीने सुरू करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पनवेल महानगरपालिका हददीत प्लॉट नं. १०, सेक्टर-०२, ई, कळंबोली तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तळोजा या ठिकाणी सतत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी केंद्र बसविण्यात आले असून ते कार्यान्वित आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या इंग्रजी शाळांमध्ये नियुक्ती करण्यात आलेल्या शिक्षकांच्या समस्यांबाबत**

**(१३) ३७७९३ (२०-०४-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या इंग्रजी शाळांमध्ये नोकरीसाठी नियुक्ती मिळूनही मराठी माध्यमातून शिक्षण घेतले असल्याचे कारण देत नोकरीसाठी डावलण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासनातील महानगरपालिका शिक्षण अधिकारी, शिक्षण समिती अध्यक्ष, शिक्षण आयुक्त यांची भेट घेऊनही यांच्याकडून या उमेदवारांना आश्वासनाशिवाय व प्रतीक्षेशिवाय काहीच हाती लागले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण असूनही हातात नोकरी नसल्याने आंदोलनाचा खर्च उचलू न शकल्याने या उमेदवारांच्या भविष्यावरच प्रश्नचिन्ह उभा राहिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई महापालिकेच्या इंग्रजी शाळांमध्ये नोकरीसाठी निवड झालेल्या शिक्षकांना नोकरीमध्ये सामावून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०९-२०२३) :** (१) व (२) एक वेळची अपवादात्मक बाब म्हणून नियुक्ती न मिळालेल्या उमेदवारांची इंग्रजी संभाषण / अध्यापन कौशल्य चाचणी घेऊन १२२ पात्र उमेदवारांना शिक्षण सेवक पदावर नियुक्त करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ३७ मधील गोपालनगर येथील गडरलाईन नवीन टाकण्याबाबत**

**(१४) ३८३१९ (१८-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ३७ मधील गोपालनगर येथील गडरलाईन सुमारे ३५ ते ४० वर्षापुर्वीची असून सद्य:स्थितीत जुनी आणि नादुरुस्त झाली असल्याने त्यातून मोठ्या प्रमाणावर गळती सुरु असल्याकारणाने स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची गंभीर बाब दिनांक १४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत काही वर्षात या परिसरात उभारण्यात आलेल्या नवीन इमारतींमुळे सदरहू गडरलाईनवरील भार वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय आणि तदनुषगाने नागपूर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ३७ मधील गोपालनगर येथील जुनी गडरलाईन बदलून त्याठिकाणी नवीन गडरलाईन टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
होय, दि. १४ जानेवारी, २०२२ ला याबाबत लोकमत दैनीक वर्तमानपत्रात बातमी आली आहे. याबाबतीत गोपालनगर परिसरातील एस.आर.पी.एफ. जलकुभांजवळ श्री. प्रशांत नागदिवे यांचे घराजवळील जुनी गडरलाईन बदलविण्याची मागणी होती. त्या अनुषंगाने या ठिकाणी नागपूर महानगरपालिकेच्या लक्ष्मीनगर क्षेत्रीय कार्यालयातर्फे नवीन गडरलाईनचे काम करण्यात आले असून येथील नागरीकांचा गडरलाईनच्या समस्येचे महानगरपालिकेतर्फे निराकरण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर सुधार प्रन्यासने नागपूर महानगरपालिकेला हस्तांतरित केलेल्या उद्यानांचे तातडीने नूतनीकरण करण्याबाबत

**(१५) ३८३२२ (२५-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर सुधार प्रन्यासने नागपूर महानगरपालिकेला हस्तांतरित केलेल्या सुमारे ४४ उद्यानांची स्थिती देखभाल दुरुस्ती अभावी दयनीय झाली असल्याची बाब दि. १४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर सुधार प्रन्यासने महानगरपालिकेला हस्तांतरित केलेल्या उद्यानांच्या प्रत्यक्ष स्थितीबाबत चौकशी करण्यासाठी स्थापत्य समिती सभापती यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि तदनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यासने नागपूर महानगरपालिकेला हस्तांतरित केलेल्या उद्यानांचे तातडीने नूतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सभापती स्थापत्य समितीच्या चौकशीच्या अहवालानुसार नुतनीकरणाकरीता मनपाच्या सुधारीत बजेटमध्ये १०० कोटीची तरतूद प्रस्तावीत केली आहे. तसेच १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून संत ज्ञानेश्वर समाधी उद्यान, दत्तात्रय सुंगधी (Fragrance) उद्यान म्हणून तयार करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच DPDC फंडातून म्हाडगी नगर शिवाजी पार्क उद्यानाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील फुटाळा तलावाजवळील सार्वजनिक उपयोगाच्या जागेवर केलेल्या अतिक्रमणाबाबत

**(१६) ३८६५० (१८-०४-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील फुटाळा तलावाजवळील मौजा-फुटाळा ख.क्र.२३२ अधिनस्त सार्वजनिक उपयोगाच्या जागेवर जेट पॅचर कंपनीने संरक्षण भिंतीचे बांधकामाद्वारे अवैधपणे कब्जा करून अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिक्रमण काढण्याबाबत महानगरपालिकेतर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजा फुटाळा सर्व्हे क्र.०६, न.भु.क्र.४, आराजी ६०० चौ.मी. जमिनीची मालकी खाजगी आहे.

जमिन मालकाने त्याचे जागेसह नकाशात दर्शविल्यानुसार सुमारे २१.८१ मी. (C to D) पर्यंत मनपा मालकीच्या जागेला संरक्षण भिंत उभारलेली होती.

(२) सदर जागेवरील अतिक्रमण काढण्यात आले आहे व सद्यस्थितीत जागा मोकळी आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानेवाडा (ता.दक्षिण नागपूर, जि.नागपूर) येथील अवदूत नगर परिसरामधील फर्निचर कारखाना शासकीय परवानगी न घेता सुरु असल्याबाबत

**(१७) ४५४०९ (२५-०९-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानेवाडा (ता.दक्षिण नागपूर, जि.नागपूर) येथील अवदूत नगर परिसरामधील रहिवाशी क्षेत्राच्या जागेवर मोठा फर्निचर कारखाना कोणत्याही प्रकारची शासकीय परवानगी न घेता सुरु असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या फर्निचर कारखान्यामुळे परिसरामध्ये नागरिकांना अत्यंत त्रास सहन करावा लागत असून, परिसरात रोगराई पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त फर्निचर कारखाना बंद करण्यात यावा यासाठी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे,

या कारखान्यामुळे परिसरामध्ये ध्वनी व वायूप्रदूषण होत असल्या संदर्भात नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(३) हे खरे आहे,

(४) संबंधीत कारखाना मालकाकडे व्यवसाय परवाना व महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले आहे. तथापि, त्यांनी असे दस्ताऐवज उपलब्ध करुन न दिल्याने या कारखान्याचा विद्युत पुरवठा खंडीत करण्याकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीला दि.२८.०६.२०२२ रोजी पत्र निर्गमित करण्यात आले. तसेच बांधकामाची शहानिशा करुन उचित कार्यवाही करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दक्षिण नागपूर (जि.नागपूर) महानगर पालिका नेहरू नगर झोन अंतर्गत रहिवाशी नागरिकांच्या घराच्या कर आकारणी संदर्भातील प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(१८) ४५४२४ (२७-०९-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण नागपूर (जि.नागपूर) महानगर पालिका नेहरु नगर झोन अंतर्गत मौजा हुडकेश्वर, नरसाळा व इतर रहिवाशी नागरिकांच्या घराच्या कर आकारणी संदर्भातील प्रकरणे मागील १ वर्षापासून प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांनी संबंधित अधिकारी यांना प्रकरणे निकाली काढण्याबाबत विचारणा केली असता त्यांना व्यवस्थित उत्तरे देण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या दोषी अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही,

(२) मौजे हुडकेश्वर नरसाळा हे जिल्हापरिषदेमधून महानगरपालिका क्षेत्रात मे,२०१३ पासून समाविष्ट झाली असून आर्थिक वर्ष २०२१ ते २०२३ या कालावधीतील कर आकारणी प्रकरणासंदर्भात प्राप्त १६७२ अर्जापैकी उर्वरित २१ अर्जावर कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राणी भोसले (ता.दक्षिण नागपूर, जि.नागपूर) येथील नगर मौजा सक्करधरा येथील झोपडपट्टी धारकांना मालकी हक्क पट्टे वाटप करण्याबाबत

**(१९) ४५८५९ (२८-०९-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राणी भोसले (ता.दक्षिण नागपूर, जि.नागपूर) येथील नगर मौजा सक्करधरा ख.स.रा.क्रमांक ३६/२ येथील झोपडपट्टी धारकांना मालकी हक्क पट्टे वाटप कार्य नागपूर सुधार प्रन्यासाकडे प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी धारकांनी भाडेपट्टेचे डिमांड शुल्क नागपूर सुधार प्रन्यासला जमा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राणी भोसले नगर मौजा सक्करधरा ख.स.रा.क्रमांक ३६/२ येथील झोपडपट्टी धारकांना मालकी हक्क पटे वाटप कार्य लवकरात लवकर करण्याच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास ना.सु.प्र.सभापती यांना पत्र व्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यास, सभापती यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) मोगरे पाणलोट विकास समितीमध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(२०) ४६२६७ (१४-१०-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) मोगरे पाणलोट विकास समिती मध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी सखोल चौकशी करुन दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५/०४/२०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हा कृषी अधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे निवेदन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने सखोल चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तदनुसार संबंधीत दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०१-०९-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय, संबधित दोषीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती शहरातील सार्वजनिक विहीरींची स्वच्छता करण्याबाबत

**(२१) ४६६६२ (१०-११-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरातील २१४ सार्वजनिक विहिरींपैकी ८५ टक्के म्हणजे १८२ विहिरी कचऱ्याने भरल्या असून त्यातील पाणी पिण्यायोग्य नसल्याचे दिनांक ११ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अस्वच्छ विहिरींमुळे पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाल्यामुळे सार्वजनिक नळांवर अवलंबून असणारे नागरिक हे नळ बंद करु देत नसल्याने तसेच त्या नळांच्या वीज देयकांची रक्कम महानगरपालिकेला भरावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने येथील विहिरींची तातडीने स्वच्छता करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

अमरावती शहरातील २१४ पैकी काही विहीरींमध्ये कचरा असल्यामुळे पाणी पिण्या योग्य नाही. या विहीरींचे सर्वेक्षण करण्याची कार्यवाही अमरावती महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.

(२) अंशत: खरे आहे.

अमरावती शहरामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पिण्याच्या पाण्याची वितरण व पुरवठा व्यवस्था करण्यात येते. शहरातील सार्वजनिक नळांमुळे पाण्याचा अपव्यय होत असून पाण्याच्या अनावश्यक देयकामुळे महानगरपालिकेवर पिण्याच्या पाण्याचा देयकाचा अतिरिक्त बोजा वाढत असल्याने सर्व सार्वजनिक नळ खांबे डिसेंबर, २०१६ पर्यंत बंद करावे असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अमरावती महानगरपालिकेच्या दि.१८.१०.२०१६ व दि.२१.१०.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तसेच दि.०९.०८.२०१८ व दि.०७.०३.२०२२ च्या पत्रान्वये संपूर्ण सार्वजनिक नळ खांब्याची सन २०१६ नंतरची देयके अदा करण्याचे दायीत्व महानगरपालिकेचे नसल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांना कळविण्यात आले आहे व देयके देणे बंद केले आहे.

(३) सद्या शहरातील २२ विहीरीतील कचरा व गाळ मशीनमार्फत काढण्याबाबत अमरावती महानगरपालिका स्तरावर निविदा प्रक्रिया सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहरात फटाक्यांचा आवाज येणारे सायलेन्सर लावून होणाऱ्या शर्यतीवर प्रतिबंध घालण्याबाबत**

**(२२) ५०२७२ (१९-०१-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई वांद्रे-कुर्ला संकुलासह, लालबहादूर शास्त्री मार्ग, पूर्व व पश्चिम द्रुतगती मार्गावर वाहनाच्या व मोटारबाईकच्या सायलेन्सर मध्ये बदल करून मोठ्या फटाक्यांचा आवाज येणारे सायलेन्सर लावून होणाऱ्या शर्यंतीमुळे नागरिकांना आवाजाचा त्रास होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आवाज फाऊंडेशनकडे शर्यतींना प्रतिबंध घालण्याकरिता अनेक तक्रारी केलेल्या असून देखील सदर प्रकरणांत वाहतूक पोलीस आणि आरटीओने संबंधितावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर प्रकराच्या शर्यंतीना आळा व ध्वनी प्रदुषण दूर करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** (१) होय.
मोटार वाहन विभागाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (मध्य) कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कुलाबा, भोईवाडा व वरळी येथे अशा प्रकारची प्रकरणे निदर्शनास आली आहेत.
(२) मोटार वाहन विभागाच्या मुंबई क्षेत्रिय कार्यालयात आवाज फाउंडेशन तर्फे उपरोक्त बाबतीत कोणतीही तक्रार केल्याचे दिसून येत नाही.
बृहन्मुंबई हद्दीत एकूण ५० वाहतूक विभाग आहेत. सदर वाहतूक विभागांमध्ये अद्यापपर्यंत फटाक्यांचा आवाज येणारे सायलेन्सर लावून वाहने चालविणाऱ्या १४८ वाहनांवर मोटार वाहन कायदा,१९८८ अंतर्गत कलम १९८ अन्वये दंडात्मक कारवाई पोलीस (वाहतूक) विभागामार्फत करण्यात आली आहे. सदर दंडात्मक कारवाईची मर्यादा रु.१०००/- एवढी आहे. यामध्ये काही बदल करावयाचा झाल्यास त्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करावा लागेल.
वाहनामध्ये अनधिकृत बदल केल्यास, मोटार वाहन कायदा कलम १८२ (अ) अंतर्गत कारवाई करता येईल. सदर कलमांतर्गत वाहन उत्पादक अथवा वाहन विक्रेते यांनी गुन्हा केल्यास अशा दोषी व्यक्ती अथवा कंपनी विरुद रुपये १ लक्ष दंड अथवा एक वर्षापर्यंत कैद किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते.
(३) पोलीस (वाहतूक) विभागात होणाऱ्या वाहनांच्या शर्यतींना आळा घालण्याकरीता नाकाबंदी करण्यात येते. या व्यतिरिक्त कलम १९०(२) अंतर्गत वायु प्रदुषण, ध्वनी प्रदुषण व रस्ता सुरक्षा संदर्भाने विहीत निकषांचे उल्लघन करणाऱ्या व्यक्ती विरुध्द पहिल्या गुन्ह्यासाठी ०३ महिन्यांची कैद अथवा रुपये १०,०००/- पर्यंत दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा नमूद आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील माहिती आयुक्तांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२३) ५०९४९ (२३-०१-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गैरव्यवहार उघडकीस आणण्यासाठी शासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या

माहिती अधिकाराचे सुलभरितीने काम होत नसल्याने माहे ऑक्टोबर, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक, औरंगाबाद व अमरावती खंडपीठात माहिती आयुक्तांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त असल्याने आजतागात राज्यात ९० हजार २४६ अपील प्रलंबित आणि १४५५६ तक्रार प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात बृहन्मुंबई, कोकण, पुणे, औरंगाबाद आणि अमरावती या पाच खंडपीठात एक ही तक्रार निकाली निघालेली नाही हे ही खरे आहे काय, असल्यास, त्यामागील कारणे काय आहेत
(४) असल्यास, माहिती अधिकार कायद्यांतर्गत दाखल अपिलांचा निपटारा होण्यासाठी शासनाने माहिती आयुक्ताची रिक्त असलेली पदे भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नाशिक या पदावर दि.०८.०५.२०२३ पासून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद/अमरावती या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.नाशिक, औरंगाबाद आणि अमरावती खंडपीठांमधून ४८७६५ द्वितीय अपिले आणि ६८१८ तक्रारी प्रलंबित आहेत. राज्यातील बृहन्मुंबई, कोकण, पुणे, औरंगाबाद व अमरावती या खंडपीठात २४८० तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत.
(४) माहिती आयुक्तांची रिक्त पदे भरण्यासाठी देण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यात येत असून त्यानंतर विहित कार्यपध्दती अनुसरुन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दक्षिण नागपुर (जि.ठाणे) येथील अनेक वस्त्यांमधील गटर लाईनचे काम करण्याबाबत

**(२४) ५१०८६ (२७-०१-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण नागपूर (जि.नागपूर) येथील नागपूर महानगर पालिकेच्या नेहरू नगर झोन अंतर्गत कामगार नगर येथील गटर लाईन तुटलेली असल्याने गटाराचे घाण पाणी नागरिकांच्या घरामध्ये शिरत असल्याची बाब दिनांक ९ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गटाराच्या दुषित पाण्यामुळे येथील परिसरात आजाराचे प्रमाण वाढल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याने प्रशासनाला वारंवार निवेदन देऊनही प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाला दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०९-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
कामगार नगर येथील रमना मारुती गेट समोरील तीन घरांमध्ये अती पावसामुळे पर्जन्य वाहिनी भरुन वाहिल्याने पाणी शिरले होते.
(२) व (३) हे खरे नाही.
तथापि, पर्जन्य वाहिनी भरुन वाहू नये याकरिता या भागामध्ये भूमीगत पर्जन्य वाहिनी टाकण्याकरिता रु.२३.५९ लक्ष किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून निविदा प्रक्रिया महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे आखाडा बाळापूर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याबाबत

**(२५) ५१२२१ (२०-०१-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आखाडा बाळापूर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी शासनाकडे दिनांक १५/०९/२०२२ रोजी पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास तात्काळ मंजूरी देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८/०९/२०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मौजे आखाडा बाळापूर ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, हिंगोली यांचा दि.१५ सप्टेंबर, २०२२ रोजीचा प्रस्ताव महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील संबंधित तरतूदींच्या अनुषंगाने नसल्याने दि. ०३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव परत करण्यात आला आहे.

तसेच सदर प्रकरणी कृषि विभाग, उद्योग विभाग आणि जिल्हा परिषदेचे अभिप्राय घेऊन आणि जिल्हा परिषद निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाच्या निर्देशांचा विचार करुन, परिपुर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, हिंगोली यांना निदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरात भटक्या कुत्र्यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याबाबत

**(२६) ५१५८१ (२०-०१-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात भटक्या कुत्र्यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे स्थानिक जनतेला नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाच्या सन २००१ च्या सूचनेनुसार भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी नागपूर महानगरपालिकेकडून नियोजनाच्या अभावी कुत्र्यांवरील नसबंदीची प्रक्रिया प्रभावीपणे राबवले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून नागपूर शहरातील भटक्या कुत्र्यांचा स्थानिक रहिवाशांना होणारा त्रास थांबविण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

भटक्या कुत्र्यांचा प्रादुर्भाव वाढल्याच्या तक्रारी महानगरपालिकेकडे प्राप्त होत आहे.

(२) व (३) नागपूर शहरातील भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण आणण्याकरिता नियमावलीतील तरतुदीनुसार मोकाट कुत्र्यांची नसबंधी शस्त्रक्रिया व अँटी रेबीज लसीकरण कार्यक्रम सन २००६ पासून विविध सेवा भावी संस्थांमार्फत राबविण्यात येत आहे. सन २०११-१२ सन २०१६-१७ व सन २०२० ते २०२३ या कालावधीमध्ये महानगरपालिकेने

स्वत: व शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयामार्फत हा कार्यक्रम राबविला आहे. भटक्या कुत्र्यांचा प्रादुर्भाव कमी होण्याकरिता नागपूर महानगरपालिकेने सादर केलेला विशेष प्रकल्प प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वसुंधरा प्रकल्पाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(२७) ५२०१७ (२३-०१-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), ॲड.राहूल कुल (दौंड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत सुमारे १३३५ कोटींच्या वसुंधरा प्रकल्पास माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली असून दोन वर्षापासून मंद गतीने सुरु असलेले काम अद्यापही पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच उक्त कामाची दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ पर्यंत सद्य:स्थिती व त्यावर झालेला एकूण खर्चाचा तपशील काय आहे, त्यानुसार काम १०० टक्के पूर्ण होण्यास सुमारे किती कालावधी लागणार आहे,
(३) असल्यास, सदर प्रकल्पातून सिमेंट नाला बांध, शेतीची बांध बंदिस्ती, सलग समतल चार, वृक्ष लागवड, शेततळे ही कामे केली जाणार असून सदरची कामे या प्रकल्पातून सुरु करणे आवश्यक असताना जलसंधारण विभागाकडे असणारा अपुरा कर्मचारी वर्ग तसेच कृषी विभागाची सांगड बसली नसल्याने सदर प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०१-०९-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) दि.१०.११.२०२२ पर्यंत सदर योजनेवर खर्च झाला नाही.
(३) अंशत: खरे आहे.
(४) प्रश्न उपस्थित होत नाही. शासन स्तरावरुन वेळोवेळी प्रगतीचा आढावा घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील भंगार गाडया ठेवण्यासाठी एसआरए प्रधिकरणाकडून मुंबई महापालिकेस दिलेली माहूल येथील जागेबाबत**

**(२८) ५२८६८ (२७-०१-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भंगार गाडया ठेवण्यासाठी एसआरए प्रधिकरणाकडून मुंबई महानगरपालिकेस दिलेली माहूल येथील १० हजार चौरस मीटरचा टेकडवरील भुखंडाची जागा अजूनही वापराविना पडून असल्याने भंगार गाडयांचा यार्ड प्रकल्प कागदावरच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महापालिकेच्या विकास आराखडा १९९१ च्या तरतूदीप्रमाणे एखाद्या औद्योगिक क्षेत्रांचे रुपांतर नागरी क्षेत्रात होत असताना त्यापैकी २५ टक्के हिस्सा हा पालिकेच्या ताब्यात दिल जातो, त्याप्रमाणे एसआरएकडून माहूल जवळील ३९,१६० चौरस मीटर एवढे क्षेत्रफळ असलेला भूखंड मुंबई महानगरपालिकेस सोपविण्यात आला असून या ३९,१६० चौरस मीटर भूखंडापैकी १०,१९० चौरस मीटर भूखंडाचा वापर भंगार गाडयांच्या यार्डासाठी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने सदर भूखंडावर भंगार गाडयाच्या यार्डासाठी निर्णय घेऊन आजमितीस १ वर्षांहून अधिक कालावधी उलटून गेलेला असतानाही आजमितीस हा प्रकल्प कार्यान्वित झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, मुंबई महापालिकेने सदरहू भूखंडावर भंगार गाडयाच्या यार्ड प्रकल्प राबविण्याचा घेतलेल्या निर्णयाची विनाविलंब अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) सदर सुविधा भूखंड अंशत: टेकडीवर/हिरवळ व अंशत: समतोल जमिनीवर असल्यामुळे त्याचा वापर भंगार गाड्यांच्या यार्डसाठी करता येत नाही.
(५) सदर सुविधा भूखंडाचे सपाटीकरण, संरक्षक भिंत बांधणे इत्यादीकरिता आदेश देण्याविषयी मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण) यांना कळविण्यात आले आहे. तसेच सद्य:स्थितीत वरच्या पातळीवर असलेली सुविधा भूखंडाची जागा खालच्या पातळीवर समतोल भूखंडावर स्थलांतरीत करण्याची विनंती करण्यात आली आहे.

---

## सोलापूर - तुळजापूर – धारशिव(उस्मानाबाद) रेल्वे मार्गास राज्य शासनाचा ५०% हिस्सा देणेबाबत

**(२९) ५४३०९ (२४-०१-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर-तुळजापूर-धारशिव (उस्मानाबाद) या रेल्वे मार्गसाठी राज्य शासनामार्फत निधीची तरतूद करण्याबाबत लोकप्रतिनिधिनी दि.११.०८.२०२२ रोजी व तत्पूर्वी वारंवार शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा रेल्वे मार्ग सन २०१९ मध्ये राज्य शासनाचा ५०% वाटा व केंद्र शासनाचा ५० % वाटा देण्याच्या धर्तीवर मंजूर करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील रेल्वे मार्गाचे भूमिपूजन देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी साहेब यांनी ऑनलाइन पद्धतीने सन २०१९ मध्ये केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू रेल्वे मार्ग साठी केंद्र शासनाने आत्तापर्यंत रु. ३२ कोटी इतका निधी उपलब्ध करून दिला आहे, माहे जानेवारी २०१९ मध्ये राज्य शासनाचे परिवहन विभागाचे मुख्य सचिव यांनी लेखी पत्राद्वारे केंद्र शासनास राज्य शासनाचा ५०% वाटा राज्य शासन देण्यास तयार असल्याचे कळवून देखील राज्य शासनातर्फे काहीच निधी उपलब्ध केला गेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्य शासनाचा हिस्सा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही.
(४) व (५) नाही.
केंद्र शासनाने या रेल्वे मार्गासाठी सन २०२१-२२ साठी रु.१० कोटी व सन २०२२-२३ साठी रु.१० कोटी निधीची तरतुद केली होती. तसेच सन २०२३-२४ साठी रु.११० कोटी तरतूद केली असल्याचे रेल्वे विभागाने कळविले आहे. सोलापूर-तुळजापुर-उस्मानाबाद या नवीन रेल्वेमार्ग प्रकल्पामध्ये राज्य शासनाचा ५०% आर्थिक सहभाग घेण्याबाबतचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला असून त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १०.०२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. राज्य शासनाने या प्रकल्पाकरिता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी रु.४०.०० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे. सदरहू रेल्वे मार्ग प्रकल्पाची अंमलबजावणी महारेल द्वारे करण्याबाबत राज्यमंत्रिमंडळाने मान्यता दिली असून त्यास अनुमती देण्याबाबत रेल्वे मंत्रालयास दिनांक २६ जून, २०२३ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

---

## राज्यातील अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण व शहरी क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत विकास कामांवरील स्थगिती उठविणेबाबत

**(३०) ५४९९१ (१८-०१-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण - संगमेश्वर (जि.रत्नागिरी) विधानसभा मतदारसंघात अतिवृष्टीमुळे महापूरासारखी परिस्थिती निर्माण होऊन अतिवृष्टीत जीवीत व इतर हानीही मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिनांक २२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून अशा प्रकारची नैसर्गिक आपत्ती, पूरजन्य परिस्थितीसंदर्भात उपाययोजना राबविण्याकरिता अल्पसंख्यांक विकास विभाग शासन क्रमांक ग्राक्षेवि-२०२२/प्र.क्र.३३/का-९, मंत्रालय, दि. १२ मे २०२२ व्दारे मंजूरी देण्यात आली होती, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सरकारने नैसर्गिक आपत्ती व पूरजन्य परिस्थितीसंदर्भातील उपाययोजनाच्या कामांना स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मंजूर झालेली कामे ही अत्यंत निकडीची असल्याने तातडीने होणे अत्यंत आवश्यक असल्याने राज्यातील अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण व शहरी क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत विकास कामांवरील स्थगिती उठविण्याबाबत शासनाची कोणती भूमिका आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०८-२०२३) :** (१) व (२) नाही. अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक बहुल क्षेत्रविकास योजनेंतर्गत अल्पसंख्याक वस्तीमध्ये मुलभूत / पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता निधी वितरीत करण्यात येतो. त्यानुसार विभागाने निधी वितरीत केला आहे.

(३) शासन निर्णय दिनांक ३१ मार्च, २०२२ अन्वये मंजूर विकास कामांची सद्यस्थिती तपासून स्थगितीबाबत निर्णय घेण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील सांडपाणी समुद्रात, खाड्यात, नाले, नद्यांमध्ये सोडण्यात येत असल्यामुळे जलस्त्रोतांमध्ये होत असलेले प्रदुषण

**(३१) ५६५१३ (२४-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांडपाणी समुद्रात, खाड्या, नाले, नद्यांमध्ये सोडण्यात येत असल्यामुळे जलस्त्रोतांमध्ये मोठ्या प्रमाणात जल प्रदुषण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलस्त्रोत स्वच्छ ठेवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने समुद्रात सोडण्यात येणारे सांडपाणी रोखण्याची योजना हाती घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेचा अहवाल तयार करण्यासाठी महानगरपालिकेने टंडन अर्बन सोल्युशन्स ही सल्लागार कंपनी नेमली असून त्यासाठी कंपनीला १ कोटी ७५ लाख रुपये मानधन दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कंपनीला अहवाल तयार करण्यासाठी किती कालावधी लागणार असून या योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पूर्व व पश्चिम उपनगरे आणि शहर विभागातील खाड्या / समुद्राला जाऊन मिळणाऱ्या सर्व मोठे नाले व त्यांच्या उपनाल्यांमधून प्रवाहित होणाऱ्या बिनपावसाळी प्रवाहास अडविणे व वळविणे तसेच पर्जन्य जलवाहिन्या (नाले) मधून प्रक्रिया न केलेले

सांडपाणी समुद्रात / खाड्यांमध्ये प्रवाहित झाल्यामुळे होणारे प्रदुषण रोखण्याकरिता सल्लागाराची नेमणुक करण्याकरिता दोन निविदा मागविण्यात आल्या होत्या.

प्रथम निविदेत बृहन्मुंबईतील २९ मोठ्या नाल्यांमुळे होणारे प्रदुषण रोखण्याकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याकरिता मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा. लि. यांना रु. १.७५ कोटी इतक्या रकमेचे कंत्राट दिले आहे. तसेच द्वितीय निविदेत सदर कंपनीस उर्वरित अतिरिक्त मोठ्या नाल्यांमुळे होणारे प्रदुषण रोखण्याकरिता रु. ४.२१ लाख इतक्या रकमेचे कंत्राट दिले आहे.

(४) सदर सल्लागार कंपनीस प्रथम निविदेतील २९ मोठ्या नाल्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याकरिता साडेआठ महिने व द्वितीय निविदेतील उर्वरित अतिरिक्त मोठ्या नाल्यांकरिता तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे.

सदर सल्लागारास दिनांक २०.०२.२०२३ रोजी कामाचा कार्यादेश देण्यात आला असून, त्यांचेमार्फत योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सुचविलेली कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात येणार आहेत, त्यामुळे मोठ्या नाल्यांमध्ये होणाऱ्या प्रदुषणास अटकाव होईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांची पदे भरण्याबाबत

**(३२) ५६७९१ (२४-०४-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतील सुमारे ८४० सुरक्षा रक्षकांची भरती करण्याचे आदेश सन २०१८ रोजी महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र ४ वर्ष उलटूनही अद्याप सुरक्षा रक्षकांची भरती करण्यासंदर्भांत प्रशासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीची सुरक्षा ही सुरक्षा विभागाकडून केली जाते, मात्र आजतागायत मुंबई महापालिकेच्या मुख्यालय इमारतींची सुरक्षा करण्यासाठी ६९ सुरक्षा रक्षक कर्मचारी हे ३ पाळीमध्ये कार्यरत असून यामधील २४ जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्यःस्थितीत सुरक्षा रक्षक विभागात २३४७ पदे कार्यरत असून तब्बल १७३५ पदे रिक्त असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या सुरक्षेच्या दृष्टीने सदरील रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०८-२०२३) :** (१) व (२) सन २०१७ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त झाल्याने सरळसेवेने पदे भरण्याचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीकरीता सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक १२.०१.२०१८ रोजी, सुरक्षा रक्षकांची ५० टक्के रिक्त पदे सरळसेवेने व ५० टक्के रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता मंजूरी दिली.

दरम्यान बिंदूनामावल्यांची पडताळणी तसेच दिव्यांग व्यक्तींकरीता आरक्षण, सामाजिक-शैक्षणिक व मागासवर्ग आरक्षण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीता आरक्षण अशा आरक्षणांचा नव्याने अंतर्भाव झाल्याने उपरोक्तप्रमाणे नव्याने प्रस्ताव मंजूरीकरीता सादर करण्यात आला.

दरम्यानच्या काळात आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ३०.०९.२०१९ रोजीच्या आदेशान्वये, महसूल आणि खर्चातील आर्थिक काटकसरीच्या धोरणाची अंमलबजावणी करताना उपाययोजना म्हणून फक्त अनिवार्य सेवांमध्ये थेट संबंधित असणाऱ्या कर्मचाऱ्यांची पदभरती करण्याबाबत निर्देश प्राप्त झाले. यास्तव, सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आला.

तद्नंतर माहे मार्च २०२० ते माहे एप्रिल, २०२१ या कालावधीत कोरोना महामारीची परिस्थिती निर्माण झाल्याने सरळसेवा भरतीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

माहे मे, २०२१ मध्ये मा. महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने भरती प्रक्रियेबाबतचा प्रस्ताव पुन:श्च सादर करण्यात आला. सदर कार्यवाही दरम्यान सुरक्षा रक्षक पदाच्या अर्हता कालबाह्य असल्याने त्या सुधारित करणे आवश्यक होते. यास्तव, सदर अर्हता सुधारित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालय इमारतींची सुरक्षा करण्यासाठी सुरक्षारक्षकांची ९७ मंजूर पदे आहेत. त्यापैकी २९ पदे रिक्त असून ६८ पदे कार्यरत आहेत. या ६८ सुरक्षारकांमार्फत तीन सत्रांमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयाची सुरक्षा पार पाडली जाते.

(४) सद्य:स्थितीत सुरक्षारक्षक विभागात सुरक्षारक्षकांची ३८०९ मंजूर पदे आहेत. त्यापैकी १७६२ पदे रिक्त असून २०४७ पदे कार्यरत आहेत.

(५) माहे मे, २०२१ मध्ये मा. महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने भरती प्रक्रियेबाबतचा प्रस्ताव पुन:श्च सादर करण्यात आला. सदर कार्यवाही दरम्यान सुरक्षा रक्षक पदाच्या अर्हता कालबाह्य असल्याने त्या सुधारित करणे आवश्यक होते. यास्तव, सदर अर्हता सुधारित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या अंमलबजावणीकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याबाबत

**(३३) ५७२८१ (०९-०५-२०२३). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.निलेश लंके (पारनेर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१४-१५ मध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविण्यास सुरुवात करण्यात येऊन राज्यात दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ रोजीपासून "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.००" सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिका वगळून इतर महानगरपालिका, नगरपालिका, एक लाख लोकसंख्येची ग्रामीण शहरे, नगरपरिषदा, नगरपंचायती यासंबंधीचे घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन करणे, शहराचा विकास आराखडा तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे ही प्रमुख कामे या अभियानामार्फत केली जात असून त्यास राज्य व केंद्र सरकार अर्थसाह्य देत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अभियानाची सुरुवात करण्यापूर्वी स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या संचालक पदावरून दिनांक १८ जुलै, २०२२ ते १२ डिसेंबर, २०२२ या सहा महिन्याच्या कालावधीत नगर विकास विभागाने तडकाफडकी तीन अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यामुळे अभियानाच्या अंमलबजावणीत अडथळा निर्माण होऊन शासनाचे त्याकडे दुर्लक्ष झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी माहिती घेऊन अभियान राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०८-२०२३) :** (१) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० च्या धर्तीवर राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० ची अंमलबजावणी दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी सुरु करण्यात आली आहे.
(२) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शाश्वत घनकचरा व्यवस्थापन, शाश्वत स्वच्छता, आणि वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया या घटकांकरिता केंद्र, राज्य व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था निधी उपलब्ध होणार आहे. तसेच १ लक्षपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरात भूमीगत गटाराचे जाळे (Sewage Network)उभारणे व नवस्थापित नगरपरिषद/नगरपंचायतींच्या घनकचरा संकलन व वाहतुक या बाबींकरिता राज्य व नागरी स्थानिक संस्थांमार्फत निधी उपलब्ध होणार आहे.
(३) हे खरे नाही.
(४) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० ची अंमलबजावणी राज्यस्तरावर मिशन मोड पध्दतीने सुरु आहे.

सदर अभियानातंर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा शहर घनकचरा व्यवस्थापन कृती आराखडा आणि स्वच्छता कृती आराखडा असा एकूण रुपये १२,४०९.३१ कोटी किंमतीचा आराखडा केंद्र शासनाकडून मंजूर करुन घेण्यात आला आहे.

सदर अभियानाकरीता आतापर्यंत केंद्र व राज्य शासनाचा एकूण ३०७.०७२६ कोटी इतका निधी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत करण्यात आला आहे.

स्वच्छ भारत अभियान-२.० अभियानांतर्गत सर्व मंजूर प्रकल्पांसाठी घनकचरा व्यवस्थापन आणि मलनिस्सारण संबंधित मंजूर झालेल्या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्यासाठी दिनांक १४/२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये संस्थांचे विभागनिहाय नामिकासूची (empanelment) तयार करण्यात आले आहेत. तसेच सदर सर्व प्रकल्प विहित कालमर्यादेत व प्रकल्पांची कामे समक्षपणे अंमलबजावणी करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिनांक १४/२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत.

आकांक्षी सार्वजनिक शौचालये १,०६८ सीटसचे प्रकल्प, जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठीचे १८६ प्रकल्प तसेच यांत्रिक साफसफाई करण्यासाठी ७ शहरांना २९ यांत्रिक सफाई वाहने (MECHANCIAL ROAD SWEEPERS) खरेदीस राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मंजूरी दिली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेने पदपथ विषयक धोरण जाहिर करूनही त्याची अंमलबजावणी झाली नसल्याबाबत

**(३४) ५७३५७ (२४-०४-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेने सन २०१६ मध्ये पादचाऱ्यांची सुरक्षितता लक्षात घेता पदपथविषयक धोरण आखलेले असून ७ वर्षे लोटले तरी या धोरणातील मार्गदर्शक तत्वानुसार एकाही पदपथावर पादचारीस्नेही बदल होऊ शकलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्यावरील पहिला अधिकार पादचाऱ्यांचा असल्याचे मान्य करून पदपथ धोरण आखले गेले परंतु अरुंद रस्ते, अपुरी पार्किंग व्यवस्था आणि त्यात पदपथांची विचित्र आणि पादचारीविरोधी रचना यामुळे हे धोरण आजमितीस कागदावरच राहिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पदपथावरील वाढती वर्दळ, फेरीवाल्यांचे अतिक्रमण, उखडलेले पेव्हरब्ला ॅक रस्ते, अनधिकृत पार्किंग, झोपड्या अशा अनेक अडचणींमुळे पादचाऱ्यांसाठी पदपथ असुरक्षित बनले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू पदपथ विषयक धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक २८.१२.२०१६ रोजीच्या पादचारी प्रथम-पदपथ या धोरणामध्ये पदपथांची रुंदी, पृष्ठभाग, उपयोगिता सेवांची रचना, पादचारी झोन, फर्निचर झोन, पदपथांची उंची, गार्डरेल इत्यादी मार्गदर्शक तत्वांचा अंतर्भाव असून, सदर धोरणानंतर नुतनीकरण करण्यात आलेल्या रस्त्यांच्या रुंदीनुसार पदपथांवर अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

याव्यतिरिक्त खड्डेमुक्त पदपथ निर्माण करण्यासाठी दिनांक ०२.०२.२०१९ रोजीच्या पदपथ सुधारणेबाबतच्या धोरणानुसार, पदपथाच्या रुंदीनुसार पेव्हर ब्लॉकऐवजी सिमेंट कॉंक्रिट, स्टेनसील कॉंक्रिटचा वापर करुन पदपथांची सुधारणा करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक २८.१२.२०१६ रोजीच्या पादचारी प्रथम-पदपथ या धोरणानुसार, नमूद केलेल्या निर्देशांचे रस्त्यांच्या पदपथ दुरुस्ती तसेच नुतनीकरणादरम्यान पालन केले जाते. अरुंद रस्त्यांविषयी मागणी प्राप्त झाल्यानंतर रस्तारेषा निश्चित करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते विभागामार्फत करण्यात येते. तसेच सदर रस्तारेषामध्ये बाधीत झालेल्या बांधकामांवर निष्कासनाची कार्यवाही केल्यानंतर सदर अरुंद रस्त्याचे विस्तारीकरण कंत्राटदार नेमून करण्यात येते.

तसेच विकास नियोजन आराखड्यात दर्शविल्याप्रमाणे रस्त्यांचे बांधकाम करण्यात येते. सदर विस्तारीकरण दरम्यान व कोणत्याही रस्त्याच्या दुरुस्ती दरम्यान पदपथ धोरणाचे काटेकोरपणे पालन करण्यात येते.

मुंबईतील वाहतूक समस्या निराकरण करण्याच्या दृष्टीकोनातून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात एकूण ३२ वाहनतळे असून, सदर वाहनतळांची एकूण क्षमता २७,३९५ इतकी आहे. त्यापैकी कंत्राटदारांची नियुक्ती करुन ३१ वाहनतळे जनतेसाठी खुली करण्यात आली आहेत. उर्वरित १ वाहनतळाकरिता निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. तसेच ९१ ठिकाणी रस्त्यावरील वाहनतळे असून, सद्य:स्थितीत ६८ ठिकाणी वाहनतळे कार्यान्वित आहेत व २३ ठिकाणची वाहनतळे ही विविध पायाभूत सुविधांच्या कामांमुळे तात्पुरत्या स्वरुपात बंद ठेवण्यात आली आहेत.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतूद नियम क्र. ५३ मध्ये भूमिगत वाहनतळ (अंडरग्राऊंड पार्किंग) बनविण्याबाबत सुचविण्यात आले आहे. तसेच महानगरपालिका हद्दीतील विविध विभागांमध्ये उद्याने, खेळाची मैदाने व सार्वजनिक खुल्या जागा यांमध्ये भूमिगत वाहनतळे अंतर्भूत करण्यात आली आहेत.

मुंबादेवी येथे ५४६ व माटुंगा मध्य रेल्वे स्थानकाजवळ ४७५ रोबोटिक पार्किंगबाबत कार्यादेश देण्यात आले आहेत. तसेच, प्रस्तावित असलेल्या ३ बहुस्तरीय यांत्रिकी वाहनतळांन्वये जवळपास ९४८ पार्किंग जागा उपलब्ध होणार आहे.

तसेच, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील अधिनियम ५१ अन्वये, मुंबई वाहनतळ प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार असून, त्याकरिता मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलमांमध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात येणार आहे.

(३) पावसाळयात शेवाळयामुळे फरश्या गुळगुळीत होणे, फरश्या तुटणे व पदपथ असमतोल होणे हे टाळण्याकरिता माहे फेब्रुवारी, २०१९ पासून नवीन पदपथ बनवितांना किंवा जुने दुरुस्त करतांना आत पेव्हर ब्लॉक / फरश्यांऐवजी स्टॅम्पड सिमेंट कॉंक्रिटचा वापर केला जात आहे.

माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत एकूण १,७५,९८० अनधिकृत पथविक्रेत्यांच्या अतिक्रमणाविरुध्द निष्कासनाची कारवाई करण्यात आली असून, सदर कारवाईत एकूण रु. २.५० कोटी तसेच माहे जानेवारी, २०२३ ते मार्च २०२३ या कालावधीत एकूण ४५,००६ अनधिकृत पथविक्रेत्यांच्या अतिक्रमणाविरुध्द निष्कासनाच्या कारवाईत एकूण रु. ६१.४३ लाख इतका विमोचन आकार महसूल वसुल करण्यात आला आहे.

(४) सन २०१६ मध्ये जाहीर केलेल्या पदपथ विषयक धोरणानुसार नवीन पदपथांची सुधारणा करण्यात आलेली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि.बीड) येथील पाणलोट समिती सचिव यांचे प्रलंबित मानधन अदा करण्याबाबत

**(३५) ५७४०५ (११-०५-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) तालुक्यातील पाणलोट समिती सचिव यांचे मानधन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मानधनाबाबत पाणलोट समिती सचिवांच्यावतीने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल केली असून मा.न्यायालयाने निर्णय घेण्याबाबत आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) त्यानुसार वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयाकडे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड यांनी निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीड जिल्ह्यातील पाणलोट समिती सचिव यांचे प्रलंबित मानधन न्यायनिर्णयानुसार तातडीने अदा करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून मानधनासाठी किती रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०१-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

केज (जि. बीड) तालुक्यातील पाणलोट समिती सचिव यांचे मानधन प्रलंबित होते. सदरचे प्रलंबित मानधन वसुंधरा कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र. ९९६६/२३ दि. २०/०३/२०२३ अन्वये मंजूर करून दि.३१/०३/२०२३ अखेर अदा करण्यात आलेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर मानधनाबाबत पाणलोट समिती सचिवांच्यावतीने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका क्र. १२३९९/२०२१ दाखल केली होती.मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांच्या दि. १७.११.२०२१ रोजीच्या आदेशानुसार सदर प्रकरणी सक्षम अधिकारी यांनी निर्णय घेण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

(३) मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांच्या निर्देशानुसार प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी वसुंधरा, पुणे कार्यालयाकडे निधीची मागणी केली होती.

(४) पाणलोट समिती सचिव यांचे प्रलंबित मानधन न्यायनिर्णयानुसार तातडीने अदा करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी केल्याच्या पत्राची प्रत या कार्यालयास प्राप्त झाल्याचे निदर्शनास येत नाही.

(५) सचिवांचे प्रलंबित मानधन रक्कम अदा करण्यात आलेले आहे. त्यामुळे चौकशी करणेचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर नगरपंचायत मधील सफाई कामगारांना कायमस्वरूपी सेवेत घेण्याबाबत

**(३६) ५७४८३ (२४-०४-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर नगरपंचायत मधील सफाई कामगारांना कायमस्वरूपी सेवेत समावेश केले जात नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारनेर नगरपंचायत यांच्या कार्यालयातून कायमस्वरूपी सेवेत घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सफाई कामगारांना कायमस्वरूपी सेवेत समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही,

तथापि, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या अहवालानुसार, पारनेर नगरपंचायतीमधील कार्यरत ११ सफाई कर्मचाऱ्यांपैकी एक सफाई कर्मचारी शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याने, त्यांचे नवनिर्मित पारनेर नगरपंचायतमधील मुकादम पदावर समावेशन करण्यात आले आहे. अन्य १० सफाई कर्मचारी विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्याने त्यांचे समावेशन प्रस्तावित करता येत नाही.

(३) राज्यातील नवनिर्मित नगरपरिषदा/ नगरपंचायतींमधील भुतपुर्व ग्रामपंचायतीचे सफाई कामगार पदावरील कर्मचाऱ्यांचे त्याच नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या आस्थापनेवर एकवेळची विशेष बाब म्हणून अधिसंख्य अस्थायी पद निर्माण करण्याच्या अनुषंगाने, माहिती संकलित करण्याची कार्यवाही नगरपरिषद प्रशासन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या वाहनांमधून हजारो लिटर इंधनाची चोरी होत असल्याबाबत

**(३७) ५७६०३ (२४-०४-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या कचरा वाहणाऱ्या घंटा गाड्या व इतर वाहनांमधून हजारो लिटर इंधनाची चोरी होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमताने हे गैरप्रकार घडत असून या घटनेच्या ठिकाणचे सीसीटीव्ही काढण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०८-२०२३) :** (१), (२) व (३) डिसेंबर-२०२२ मध्ये याबाबत स्थानिक वृतपत्रामध्ये पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनामधून डिझेल चोरी झालेची बातमी प्रसिद्ध झाली आहे. तथापि, चौकशी अंती संबंधित डीझेल चोरी महागरपालिकेच्या वाहनातून झालेली नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेतील २० वर्षापासून कार्यरत कंत्राटी संगणक चालक बेरोजगार होणार असल्याबाबत

**(३८) ५९९५९ (११-०५-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महापालिकेत मागील २० वर्षापासून कार्यरत १८९ कंत्राटी संगणक चालकांची सेवा संपुष्टात आणून नवीन कंत्राटदारांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव आणला असल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या संगणक चालकांवर बेरोजगारीचे संकट आले असून त्यामुळे त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेऊन सदर संगणक चालकांना फेरनियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२३) :** (१) नागपूर महानगरपालिकेमध्ये मे.जे.ॲन्ड जे, कन्सलटींग सर्विसेस या खाजगी एजन्सीमार्फत सन २०१२ पासून संगणक चालक पुरविण्यात येत आहेत. संगणक चालकांच्या संख्येत आवश्यकतेनुसार बदल करण्यात येत असून साधारणत: तीन वर्षांपासून १८९ संगणक चालक या बाह्य एजन्सीमार्फत पुरविण्यात येत आहे. या एजन्सीचा कार्यकाळ संपूष्टात आल्याने स्थायी समितीचा ठराव क्र.४३ दि.३०.०७.२०२१ नुसार कंम्पुटर मॅनेजर पुरविण्याबाबत निविदा प्रक्रिया महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

(२) संगणक चालक पुरवठा करण्याचे काम बाह्य एजन्सीमार्फत करण्यात येत असून महानगरपालिकेकडून बेरोजगार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) निविदा प्रक्रियेसंदर्भात पुढील कार्यवाही मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थगिती नसल्याने महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

---

### नागपूर शहरातील प्रमुख शहरांचे सिमेंट रस्ते बनविताना अनेक त्रुटी असल्याबाबत

**(३९) ५९९६२ (११-०५-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील प्रमुख रस्ते सिमेंटचे करताना तांत्रिक बाबींचा विचार करण्यात न येणे, जलवाहिन्या व गटार लाईन बुजविण्यात येणे, दुसरीकडील रस्ता जोडणी करताना खोलगट भाग निर्माण झाल्याने अपघाताचे प्रमाण वाढल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे जिल्ह्यातील नदी सुधार प्रकल्पाच्या कामादरम्यान मुळा-मुठा नदीच्या पात्रात बेकायदेशीरपणे राडारोडा टाकण्यात आल्याबाबत

**(४०) ६०२५३ (२४-०४-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील नदी सुधार प्रकल्पाच्या कामादरम्यान मुळा-मुठा नदीच्या पात्रात बेकायदेशीरपणे राडारोडा टाकण्यात आल्याने नदीच्या पाण्याच्या वहन क्षमतेवर परिणाम होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील पर्यावरणवाद्यांनी हा प्रकार निदर्शनास आणला असून हरित न्यायालयात दाद मागितली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुळा मुठा नदी सुधारणेच्या नावाखाली कंपनी इतरांकडून नदीपात्रात राडारोडा टाकत येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०८-२०२३) :** (१) नाही. या ठिकाणी नदी पुनरूज्जीवन प्रकल्पांतर्गत टो वॉल करणे व इम्बॅकमेंट करणे इ. कामे करण्याकरिता तात्पुरत्या स्वरूपाचे कॉफर डॅम करण्यात आलेले आहेत. टो वॉल व इम्बॅकमेंटची काम जशी जशी पूर्ण होत जातील त्या ठिकाणचे तात्पुरत्या स्वरूपाचे कॉफर डॅम काढून घेण्यात येणार आहे.
(२) नाही.
(३) नाही. मुठा नदीपात्रात तात्पुरत्या स्वरूपाचे कॉफर डॅम ज्या ज्या ठिकाणी केलेले आहेत, तेथील टो वॉल व इम्बॅकमेंटची कामे जशी जशी पूर्ण होत जातील त्या ठिकाणचे कॉफर डॅम काढून घेण्यात येणार आहे. पावसाळयापूर्वी प्रतिबंधक उपाययोजना म्हणून संपूर्ण कॉफर डॅम काढून घेण्यात येणार आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अल्पसंख्याक शाळा मधील शिक्षकांना मराठी भाषा शिक्षक म्हणून सेवेत सामावून घेण्याबाबत

**(४१) ६०६०९ (२५-०४-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अल्पसंख्याक शाळा मधील मराठी भाषा फाउंडेशनमधील वर्ग शिक्षकांना मराठी भाषा शिक्षक म्हणून सेवेत सामावून घेण्याबाबत वेळोवेळी निवेदन देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शिक्षकांना मानधन तत्वावर व कंत्राटी शिक्षक म्हणून मागील १४ वर्षापासून नियुक्ती देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुसार अल्पसंख्याक शाळामधील वर्ग शिक्षकांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मराठी भाषा फाउंडेशन योजनेंतर्गत नियुक्त मानसेवी शिक्षकांना इयत्ता ८ वी ते १० वीच्या अमराठी माध्यमाच्या (उर्दू, कन्नड, इ.)शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेनंतर मराठी भाषा शिकविण्याकरीता अतिरिक्त शिकवणी करण्यात येते. त्यासाठी त्यांची मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येते. शासन निर्णय दि.२७/०४/२०१५ अन्वये सदर मानसेवी शिक्षकांना शाळेच्या वेळेनंतर अतिरिक्त शिकवणी करणे अपेक्षित असल्याने त्याकरीता रु.५००० दरमहा मानधन देण्यात येते. शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येते. त्यामुळे सदर शिक्षकांना सेवेत कायम करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघातील अल्पसंख्यांक समाजास विकासाकरिता निधी मिळण्याबाबत

**(४२) ६०७२२ (२५-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघात अल्पसंख्यांक समाजाच्या व अल्पसंख्यांक बहुल क्षेत्राचा विकास

करण्यासाठी सुमारे ५ कोटी रुपयांचा निधी मिळावा याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास अल्पसंख्यांक मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातील उक्त समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाकडून अद्याप निधी अप्राप्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०८-२०२३) :** (१) होय,

(२) व (३) अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रविकास योजनेंतर्गत अल्पसंख्याक बहुल नागरी वस्तीत विविध मुलभूत / पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता निधी मागणीचे अनेक प्रस्ताव प्राप्त झालेले होते. तथापि, उपलब्ध निधी विचारात घेऊन विकास कामे मंजूर करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघातील विरशैव लिंगायत व विरशैव ककैय्या समाजास अल्पसंख्यांक विकास निधी मिळणेबाबत

**(४३) ६०७२६ (२५-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघात विरशैव लिंगायत व विरशैव ककैय्या समाजाच्या बहुल क्षेत्राचा विकास करण्यासाठी सुमारे ५ कोटी निधी मिळावा याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १७ जून, २०३३ रोजी वा त्यासुमारास अल्पसंख्यांक मंत्री, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांचेकडे मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार विरशैव लिंगायत व विरशैव ककैय्या समाजाचा सर्वांगीण विकासाकरिता निधी तात्काळ उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रविकास योजनेंतर्गत शासन निर्णय दिनांक १८ जून, २०१५ अन्वये केवळ अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शिख, पारशी, जैन, ज्यु) बहुल वस्तीतील लोकांचे जीवनमान उंचावण्याकरीता मुलभूत/ पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता निधी वितरीत करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई पालिकेतील कंत्राटी सफाई कामगारांच्या मागण्याबाबत

**(४४) ६११८० (११-०५-२०२३). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतील २७०० कंत्राट सफाई कामगारांना पालिकेच्या सेवेत कायम करण्याचे तसेच २०१४ पासूनची थकबाकी आणि मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरी देण्याचे मा.सर्वोच्च न्यायालयाने सन २०१७ मध्येआदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच वर्षाचा कालावधी उलटूनही पालिकेने मा.न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी केली नसल्यामुळे या कंत्राटी सफाई कामगारांनी मुंबईतील आझाद मैदानात माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने माहिती व निर्णय घेवून उपरोक्त कंत्राटी सफाई कामगारांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०९-२०२३) :** (१), (२), व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २७०० कामगारांपैकी उपलब्ध असलेल्या १६०० कामगारांना मॉनेटरी रिलीफ देण्यात यावे व मृत / कायम असमर्थ कामगारांना विशेष बाब म्हणून कायम करण्यात यावे असे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने एसएलपी ६२०२/२०१७ मध्ये दिनांक ०७.०४.२०१७ रोजी दिले.

त्यानुसार १६०० कामगारांची पडताळणी केली असता ओळख शिबीरात गैरहजर असलेले ३० व ओळख न पटलेले ७ कामगार वगळून १५६३ कामगारांना महानगरपालिका सेवेत नियुक्ती देण्यात आलेली आहे.

सदर कामगारांपैकी ११५० कामगारांस विभागस्तरावर उपलब्ध असलेल्या हजेरीपटानुसार लेखा परीक्षणसापेक्ष तसेच ३२१ कामगारांना लेखा परीक्षणानुसार थकबाकी देण्यात आलेली आहे. उर्वरित ९२ कामगारांस थकबाकी देण्याचे काम सुरु आहे.

मृत / कायम असमर्थ कर्मचाऱ्यांच्या वारसास नोकरी देण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे.

तसेच, २७०० कामगारांपैकी उर्वरित ११०० कामगारांचा पडताळणी अहवाल तपासणी अधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर त्यांना मॉनेटरी रिलीफ देण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरातील परिख पूल विस्तारीकरण करणेसाठी निधी मिळणेबाबत

**(४५) ६१६७९ (२५-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील परिख पुलाची ऊंची कमी असल्यामुळे याठिकाणी दरवर्षी पावसाळयामध्ये पाणी जास्त प्रमाणात साठत असल्याने नागरिक व वाहनचालकांची गैरसोय होत असल्याने सदर पुलाची ऊंची वाढविण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सीबीएस ते पाचबंगला भुयारी मार्ग असे दोन प्रस्ताव प्रशासनाकडे तयार असून यांस रेल्वे मंत्रालयाची अद्याप मंजूरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील परिख पुलाखालील वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे अथवा योग्य पर्याय निवडण्याबाबत चर्चा करण्यासाठी आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये (१) Structural Strengthening, widening of existing Parikh Pool (Bridge), (२)Two way underpass & overpass at other location हे दोन पर्याय सुचविण्यात आले. यापैकी पर्याय क्र.१ व्यवहार्य नसून पर्याय क्र.२ नुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन जागा निश्चित करणे, अंदाजपत्रक तयार करणे व आराखडा इ. तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्त करणे आवश्यक असून सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी रु.१० लक्ष इतकी रक्कम रेल्वे विभागाकडे जमा करण्याबाबत सूचित करण्यात आले. त्यानुसार महानगरपालिकेने रु.१० लक्ष इतकी रक्कम रेल्वे विभागाकडे जमा केली असता, सदर प्रकल्पासाठी कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत तज्ञ सल्लागार यांची

नियुक्ती करण्यात यावी व यासाठी आवश्यक ती मदत करण्यात येईल, असे रेल्वे विभागाने महानगरपालिकेस कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रीन प्लॅनेट कॉलनी, मानेवाडा (ओंकारनगर) नागपूर येथील भूखंड संगनमताने नियमित करुन विकासकांना देण्याचा प्रयत्न सुरु असल्याबाबत

**(४६) ६२१०७ (११-०५-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रीन प्लॅनेट कॉलनी, मानेवाडा (ओंकारनगर) नागपूर येथील सार्वजनिक सुविधेकरीता असलेले चार मोकळया जागेवरील करोडो रूपयांची जागा असलेले पाच अनधिकृत भूखंड विकासक व एनआयटी नागपूर येथील अधिकाऱ्यांच्या संगनमताने नियमित करून विकासकांना देण्याचा प्रयत्न सुरु असल्याची बाब दिनांक २ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राघवेंद्र गृहनिर्माण सहकारी संस्थेतील नागरिकांनी त्यांच्या लेआऊटच्या मोकळया जागा खेळाचे मैदान, उद्यान आणि मनोरंजनात्मक उपक्रमांसाठी जतन करण्यासाठी एनआयटीकडे वारंवार निवेदन देऊनही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सार्वजनिक सुविधकरीता असलेल्या चार मोकळया जागेवरील पाच भूखंडाबाबत या परिसरातील नागरिकांच्यावतीने मा.उच्च न्यायालय, नागपूर येथे याचिका दाखल करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच परिसरातील नागरिकांची मागणी लक्षात घेता सार्वजनिक सुविधेकरीता राखीव असलेल्या या जागेवर खेळाचे मैदान, उद्यानआणि मनोरंजनात्मक उपक्रमांसाठी जतन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) मौजे मानेवाडा येथील खसरा क्रमांक ६२/१, ६८/२, ६७/२ व ६९/१ मधील राघवेद्र गृहनिर्माण सहकारी संस्था या अभिन्यासातील २०५ भूखंडके व ४ खुली जागा गुंठेवारी अंतर्गत नियमित करण्यात आले आहेत. या अभिन्यासातील भूखंड क्र.५८-अ, ७१-ब या भूखंडाचे अद्याप नियमितीकरण करण्यात आलेले नाही. भूखंडाच्या नियमितीकरणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली असून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोना काळात मृत पावलेल्या पत्रकारांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत

**(४७) ६२३८१ (२५-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनाकाळात १५० हून राज्यातील पत्रकारांचा मृत्यू झाल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना काळात मृत्यू पावलेल्या पत्रकारांच्या कुटुंबीयांना शासनातर्फे मदत देण्यात आली होती काय,
(३) असल्यास, राज्यातील प्रिंट व डिजिटल माध्यमातील पत्रकारांना आरोग्य, अपघात व जीवन विमा पुरवण्यासाठी शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीसाठी पुरेशी तरतूद नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील नोंदणीकृत पत्रकारांची संख्या ही एकुण पत्रकारांपेक्षा कमी असल्यामुळे राज्यातील अनेक पत्रकारांना सदर योजनेचा लाभ मिळू शकत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय?
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर निधीची तरतूद व आजाराची व्याप्ती न वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** (१) व (२) कोरोना काळात निधन झालेल्या एकूण ६ अधिस्वीकृतीधारक पत्रकारांचा मृत्यू झाल्याचे निर्दशनास आले. शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीमधून अधिस्वीकृतीधारक पत्रकाराच्या मृत्यू पश्चात त्याच्या वारसाला रुपये १ लक्ष इतक्या रकमेचे आर्थिक सहाय्य देण्यात येते.

त्यानुसार सदर पत्रकारांच्या वारसाला त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार रुपये १ लक्ष इतकी आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

(३) व (४) असे निदर्शनास आले नाही. "शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी (Trust)" ची स्थापना दि.०१.०८.२००९ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. सद्यस्थितीत या अंतर्गत एकूण रुपये ५० कोटी इतका निधी आहरीत करुन राष्ट्रीयकृत बँकेत ठेव म्हणून ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यावरील व्याजाच्या रक्कमेतून अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना आजारावरील वैद्यकीय उपचारांकरीता मदत आणि अधिस्वीकृतीधारकाचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत दिली जाते. दि.२.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये "शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी (Trust)" या योजनेच्या विश्वस्त मंडळामार्फत "आचार्य बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजना" राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. या अंतर्गत दिनांक १०.०३.२०२२ च्या शासन निर्णयान्वये पात्र ज्येष्ठ पत्रकारांना मासिक रु.११,०००/- इतका सन्मान निधी दिला जातो. सध्या १५४ ज्येष्ठ पत्रकारांना याचा लाभ देण्यात येत आहे.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेच्या विश्वस्त मंडळाने शिफारस केल्यानूसार लाभार्थ्यांच्या पात्रतेच्या निकषात जे जेष्ठ पत्रकार पात्र ठरतील अशा जेष्ठ पत्रकारांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेचा लाभ देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौ. कचारवाडी (ता. जि.बीड) येथे साठवण तलाव बांधकामास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करण्याबाबत

**(४८) ६२६८९ (२४-०४-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कचारवाडी (जि.बीड) येथील साठवण तलाव बांधण्यासाठी शासनामार्फत सर्व्हे होऊन जवळपास ८ ते १० वर्षे झालेली असून त्या ठिकाणी पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र देखील शासनाकडून प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बराच कालावधी होऊन देखील कचारवाडी येथे साठवण तलाव बांधकाम करण्यात आले नसल्यामुळे तेथील मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये मा. जलसंपदा मंत्री यांना दिलेल्या निवेदनावर मा. मंत्री महोदयांनी त्याबाबतचा अहवाल शासनास पाठविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आदेशित करण्यात आले असूनही प्रकरणाधिन अहवाल शासनास अद्याप पाठविण्यात आला नसल्याचे दिनांक ७ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने आदेशीत केल्याप्रकरणी अहवाल न पाठविण्याची कारणे काय आहेत तसेच साठवण तलाव झाल्यास, त्या परिसरातील लोकांना व उसतोड कामगार कुटूंबियांना पिण्याचे व शेतीसाठी पाणी मिळून त्यांचे उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दृष्टीने साठवण तलाव बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०८-०९-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक १३/०७/२०१८ रोजी सदरील योजनेची पत्रव्यवहार संचिका जलसंपदा विभागाकडून या विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. त्यावरून सदरील योजनेचे शेतकरी, गामस्थांच्या विरोधामुळे सविस्तर सर्वेक्षण झाले नसल्याचे दिसून येते.

मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नाशिक यांच्या दिनांक २३/०३/२०१० अन्वये सदर योजनेस पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. तथापि मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांचे दिनांक २५/०३/२०२१ च्या पत्रान्वये शेतकऱ्यांच्या विरोधामुळे हाती न घेण्यात आलेल्या मध्य गोदावरी उपखोऱ्यातील १९ प्रकल्पांपैकी प्रशासकीय मान्यता प्राप्त नसलेल्या व अस्तित्वातील धरणांच्या उर्ध्व बाजूस असलेल्या प्रकल्पांचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र रद्द करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. या १९ प्रकल्पामध्ये कचारवाडी साठवण तलाव ही योजना समाविष्ट आहे.

(२) सदरचा अहवाल या विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) मध्य गोदावरी खोऱ्यात अनुज्ञेय होणाऱ्या अतिरिक्त पाण्यातून अस्तित्वातील धरणांच्या उर्ध्व बाजूस कोणताही नवीन प्रकल्प हाती घेता येणार नाही, जेणेकरून त्या धरणाच्या पाणी वापरात तुट येणार नाही. त्यामुळे कचारवाडी साठवण तलाव योजना माजलगाव धरणाच्या उर्ध्व बाजूस असल्यामुळे सदरील योजनेचे काम विभागाकडून अद्याप प्रस्तावित करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वडगाव शेरी (पुणे) येथील सिद्धार्थनगर येथील रस्ता बाधितांच्या पुर्नवसनबाबत

**(४९) ६२९७५ (१२-०५-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव शेरी (जि.पुणे) येथील सिद्धार्थनगर येथील रस्ता बाधितांचे गेल्या १४ वर्षांपासून अद्याप पुर्नवसन झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यामुले बाधित झालेल्यांच्या पुनर्वसनाकरिता महापालिका अथवा एसआरए प्राधिकरणामार्फत योजना हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) होय.

नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी दि. ०४.०२.२००८ रोजीचे पत्राद्वारे मे. लुंकड रियालिटी या विकासकाम रस्तारुंदीबाधित झोपडपट्टीधारकांचे तात्पुरत्या स्वरूपाचे पुनर्वसन स.नं. १४६, १४७ खुळेवाडी पुणे येथे करावे. असे कळविले होते. त्याप्रमाणे त्यांचे तात्परत्या स्वरूपात पुनर्वसन करण्यात आले आहे.

(२) होय.

महापालिका आयुक्त यांचे आदेश ठराव क्र ६/१०२६ दिनांक २८.०२.२०२३ व दिनांक २१.०२.२०२३ च्या मान्यता अन्वये सहाय्यक आयुक्त, नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय व उप आयुक्त (परिमंडळ क्र.०१) यांचेकडून पात्र/अपात्र रस्ताबाधित झोपडपट्टीधारकांची पडताळणी करणेची कार्यवाही पूर्ण झाली आहे. त्यानुसार स.नं. २०४+२०५ सिध्दार्थ नगर येरवडा पुणे येथील रस्तारबाधित झोपडपट्टीधारकांच्या १११ पात्र लाभार्थ्यांचे पुनर्वसन योजनेकरिता प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस दाखल केले असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माजलगाव (जि.बीड) नगर परिषदेच्या नगराध्यक्षांवर कारवाई करण्याबाबत**

**(५०) ७०४१५ (३१-०८-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष शेख मंजुर चॉदसहाब यांनी त्याचे नगरसेवक पद धारण केल्यापासुन ते पुढील काळात नगराध्यक्ष झाल्यानंतर विविध प्रकारे पालिका कर्मचारी या नात्याने अर्जदाराशी व शहरातील अनेक नागरीकांशी खंडणीपायी गैरवर्तन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी त्यांनी लोकप्रतिनिधी यांचे मानसिक खच्चीकरण करण्याचे प्रकार केल्यामुळे नगरपरिषद अधिनियम १९५५ कलम ५५ (ब) नुसार कार्यवाही करणेबाबत श्री. शिवहार चनबसआप्पा शेटे, लिपिक नगर परिषद, माजलगाव (जि.बीड) यांनी मा. मुख्यमंत्री यांच्या कार्यालयात दिनांक २२ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०९-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. माजलगाव (जि.बीड) नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष शेख मंजुर चॉदसहाब यांनी गैरवर्तन केल्यामुळे त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ५५ ब अन्वये कार्यवाही करण्याकरीता श्री.शिवहार चनबसआप्पा शेटे, लिपिक, नगर परिषद, माजलगाव (जि.बीड) यांनी मुख्यमंत्री कार्यालयात दिनांक २२ जून २०२३ रोजी निवेदन दिले आहे.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने दि.१७.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना त्यांचा अहवाल शासनास तात्काळ सादर करण्यात यावा असे कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.